*चंद्रपूर – गडचिरोली - गोंदिया या तीन नक्षलप्रभावित जिल्हयातील सिंचन प्रकल्पांसाठी 400 कोटी रूपयांचा स्वतंत्र निधी उपलब्ध होणार*

*नियोजन मंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या मागणीला राज्यपालांनी विशेष बाब म्हणून दिली मान्यता*
=====================================================================

राज्याचे अर्थ व नियोजन मंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या मागणीनुसार चंद्रपूर–गडचिरोली-गोंदिया या तीन नक्षलप्रभावित जिल्हयातील सिंचन प्रकल्पांसाठी सन 2019-20 या वर्षासाठी 400 कोटी रूपयांचा स्वतंत्र निधी उपलब्ध करण्यासाठी राज्यपालांनी विशेष बाब म्हणून परवानगी दिली आहे.

अर्थ व नियोजन मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी नियोजन विभागामार्फत चंद्रपूर–गडचिरोली-गोंदिया या तीन नक्षलप्रभावित क्षेत्रात असलेल्या सिंचन प्रकल्पांसाठी 400 कोटी रूपयांचा स्वतंत्र निधी उपलब्ध करण्याची मागणी राज्यपालांकडे केली होती. ही मागणी विशेष बाब म्हणून राज्यपालांनी मान्य केली आहे. यामुळे या तीन जिल्हयातील सिंचन प्रकल्पांची कामे वेगाने पूर्ण होण्याचा मार्ग सुलभ झाला आहे. अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकाराने चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्हयातील मागासलेल्या नक्षलग्रस्त आदिवासी क्षेत्राचे जीवनमान उंचावणा-या चिचडोह या सिंचन प्रकल्पाचे काम पूर्ण झाले आहे. चिचडोह प्रकल्पाचया माध्यमातुन चंद्रपूर जिल्हयातील 28 व गडचिरोली जिल्हयातील 43 अशा एकूण 71 गावांना पिण्याचे पाणी व 11510 हेक्टर सिंचन क्षेत्रात लाभ मिळणार आहे. त्याचप्रमाणे या भागातील महत्वाकांक्षी सिंचन प्रकल्प कोटगल बॅरेजचे काम सुध्दा प्रगतीपथावर आहे. बल्लारपूर तालुक्यातील 10 गावांसाठी सिंचनाच्या दृष्टीने वरदान ठरणा-या पळसगाव-आमडी उपसा सिंचन योजनेचे काम सुध्दा प्रगतीपथावर आहे. असोलामेंढा प्रकल्पांतर्गत पोंभुर्णा तालुक्यातील दिघोरी कालव्याच्या लाभक्षेत्रात बंद नलिका वितरण प्रणालीद्वारे सिंचन सुविधा उपलब्ध करून देण्याच्या कामाला सुरूवात झाली आहे. मुल तालुक्यातील चिचाळा व लगतच्या 6 गावांना बंद नलिका वितरण प्रणालीद्वारे सिंचन सुविधा उपलब्ध करून देण्याच्या कामाला सुरूवात झाली आहे. या सोबतच नलेश्वर मध्यम प्रकल्पाच्या मुख्य कालव्याचे काम, भसबोरण लघु प्रकल्प, पिपरी दिक्षीत लघु प्रकल्प, जानाळा लघु प्रकल्प, मौलझरी लघु प्रकल्प या लघु सिंचन प्रकल्पांच्या विशेष दुरूस्तीची कामे सुध्दा पूर्ण झाली आहेत.

असोलामेंढा सिंचन प्रकल्पाला गोसीखुर्दचे पाणी उपलब्ध झाल्यामुळे चंद्रपूर जिल्हयात 1 लाख 45 हजार हेक्टर सिंचन होत असून गोसेखुर्द प्रकल्पातुन मिळणा-या उजव्या कालव्याचा लाभ चंद्रपूर जिल्हयातील ब्रम्हपूरी, नागभीड, सिंदेवाही, सावली, चिमूर, मुल, पोंभुर्णा या तालुक्यातील शेतक-यांना होत आहे. गोसीखुर्द उजव्या कालव्याच्या किमी 34 च्या ठिकाणी घोडाझरी मध्यम प्रकल्पाकरिता लागणा-या 20 दलघमी पाण्याकरिता उपसा सिंचन योजनेसाठी रू. 86.56 कोटी किंमतीच्या अंदाजपत्रकाला नुकतीच मान्यता देण्यात आली आहे. राज्यपालांनी चंद्रपूर-गडचिरोली-गोंदिया या तीन जिल्हयातील सिंचन प्रकल्पांसाठी विशेष बाब म्हणून 400 कोटी रूपयांचा निधी मंजूर केल्याने सिंचन प्रकल्पांची कामे गतीने पूर्ण होणार आहेत. यावर्षीच्या अर्थसंकल्पात अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी चंद्रपूर-गडचिरोली-गोंदिया या तीन नक्षलप्रभावित जिल्हयात रोजगाराची विशेष योजना राबविण्यासाठी 500 कोटी रूपयांची तरतूद केली आहे हे विशेष.